# सायबर क्राईमबाबत पोलीसांचे प्रशिक्षण



सध्या मोठया प्रमाणात गुन्हेगारांकडुन लोकांची एटीएम, मोबाईलद्वारे, व संगणकाद्वारे फसवणुक करुन अर्थिक लुबाडणुक करण्यात येते. अशा आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक करुन अशा गुन्हयांना पायबंद घालण्याकरीता पोलीस अधिक्षक श्री. सुवेज हक यांनी रायगड जिल्हा पोलीसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत **डॉ.हेरॉल्ड डिकोस्टा**, Director, Intelligent Quotient Security System यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी उत्कृष्ठ मार्गदर्शन करुन अशा प्रकारचे गुन्हे उघडीस आणणेसाठी सर्व तांत्रिक बार्बीची माहीती दिली. सदरची कार्यशाळा दिनांक १७/१०/२०१५ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ०७.०० वा. पर्यंत आयोजित करण्यात आली. याबाबत पोलीस अधिक कार्यक्षमतेने व अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कौशल्यपुर्ण व व्यावसायिक पध्दतीने करुन गुन्हे उघडकीस आणतील असा विश्वास पोलीस अधिक्षक यांनी समारोप प्रसंगी व्यक्त केला. सदर कार्यशाळेत अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस उपअधिक्षक गृह, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस निरीक्षक, व सायबर संबधित अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# दिनांक २३.१०.२०१५

## पोलीस अधीक्षकांकडुन ग्राम सदस्याचा सत्कार

रायगड पोलीस मुख्यालयात आज दिनांक २३/१०/२०१५ रोजी सागर रक्षक दलाची मिटींग आयोजित करण्यात आली. सदर मिटींगमध्ये रायगड जिल्हयातुन मोठया प्रमाणावर सागर रक्षक दलाचे सदस्य उपस्थित होते. सागर रक्षक दलाच्या सदस्यांना मा.पोलीस अधीक्षक रायगड यांनी संबोधित करताना सांगितले की, सागर रक्षक दल हे पोलीसांचे कान, डोळे असुन समुद्रमार्गे मुंबईवर नियोजन पध्दतीने हल्ले झाले असुन रायगड जिल्हयात समुद्रमार्गे शस्त्रास्त्रे दारूगोळा उतरवुन त्याचा वापर मुंबईवर हल्ला करण्यासाठी वापरण्यात आले, तरी सर्व सदस्यांनी पोलीसांना काही संशयीत इसम वा काही हालचाल दिसुन आल्यास १०९३ या टोल फ्रि क्रमांकावर माहिती देवुन देशाची सुरक्षा मजबुत करण्यासाठी सतत प्रयत्नशिल रहा,

सदर मिटींगमध्ये दिनांक १३/१०/२०१५ रोजी २१.४५ वा. चे सुमारास दादर गावचे हददीत दोन संशयीत स्पिड बोट दिसल्याबाबतची माहिती सागर रक्षक सदस्य श्री गोरख नाईक रा दादर, पेण यांनी पोलीसांना दिली. सदर माहितीवरून दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक श्री शिंदे व स्टाफ यांनी ग्रामस्थांच्या मदतीने दोन स्पिड बोट अडवुन त्यांच्या बाबत चौकशी करता त्या नौसेनेच्या बोटी असुन त्यांचे प्रात्यक्षिक चालु असल्याबाबत माहिती मिळाली. ग्रमरक्षक सदस्य श्री गोरख नाईक यांनी उपयुक्त माहिती देवुन पोलीसांना मोलाचे सहकार्य केल्याने त्यांचा पोलीस अधीक्षक श्री मो. सुवेज हक यांनी पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देवुन त्यांचा सत्कार केला. सदर मिटींगला अपर पोलीस अधीक्षक श्री आर एल पवार, पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री राजेंद्र दंदाळे हजर होते.

# दिनांक १३/११/२०१५

## अपघातग्रस्ताना सहाय्य करणा-या नागरीकाची कौतुकास्पद कामगिरी





दिनांक ०७/११/२०१५ रोजी २०.३० वा.च्या सुमारास मौजे आमटेम ता.पेण गावचे हद्‌दीत मुंबई-गोवा हायवे रोडवर इको मारुती व्हॅन कार नं. एमएच-०८/झेड-२७६९ या गाडीची पादचारी इसमास ठोकर लागली त्यामुळे पादचारी इसमाचे डावे पायास दुखापत झाली. सदरवेळी रात्रीची वेळ असल्याने त्याठिकाणी उभे असलेले संजय रामा तांबोळी, रा. आमटेम यांनी पादचारी इसमांस तात्काळ हॉस्पीटलमध्ये नेवुन सहकार्य केले. त्यांच्या या विषेश सहकार्याबद्‌दल वडखळ पोलीस ठाण्याचें पोलीस निरीक्षक श्री. बोराटे व पोलीस नाईक अधिकारी /२०४१ यांनी अभिनंदन केले.

सदरबाबत वडखळ पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ५५/२०१५ भा.द.वि.सं. कलम २७९,३३७,३३८ मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

# दरोडयाच्या प्रयत्नात असलेले चार आरोपी पोलीसांच्या अटकेत

दिनांक २४/११/२०१५ रोजी नागोठणे पोलीस ठाण्याचे पोसई संदीप बळवंत पाटील हे चालक पोलीस हवालदार/५९८ एम एन म्हात्रे, पोह ९८८/एस जी पाटील यांचेसह रात्रौगस्त करीत असताना ०२.४० वा सुमारास मौजे अष्टमी गावचे हददीत रोहा नागोठणे रस्त्यावर देशमुख पेट्रोलपंपाचे मागे एका संशयित पांढ-या रंगाच्या स्विप्ट कारमध्ये चार इसम दिसुन आले त्यांना पोसई पाटील यांनी हटकले असता ते तेथुन पळुन जावु लागले म्हणुन रोहा पोलीसांना मदतीला बोलावुन एकत्रित त्यांचा पाठलाग केला. रोहा पोलीस ठाण्याचे पोना ७०२/एस डी ठाकुर, पोशि १५६५/एस ए पाटील, पोना ७५४/पी जी पाटील, पोशि ९६४/एस आर सुर्वे व नागोठणे पोलीसांनी सदर युवकांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले व त्यांची चौकशी करता त्यांचेकडे एक रिव्हॉल्वहर, एक लोखंडी कटावणी, व वायर कटर, एक मेटर कटर, तीन टि शर्ट त्याला पाठीमागील बाजुस प्रत्येकी दोन मोठे छिद्र पडलेले, ग्लोज, एक थिनर बॉटल असे साहित्य मिळुन आले. तसेच कारचे नंबरप्लेटवर असलेल्या खाडाखोडीबाबत कार मालकाकडे अधिक तपास चालु आहे.

सदरचे चार इसम हे २५ ते ३९ वयोगटातील असुन सर्व इसम हे अलिबाग येथील रहिवाशी आहेत. त्यांचेकडे प्राथमिक चौकशी करता त्यांनी देशमुख पेट्रोलपंपाचे लगत असलेल्या एटीएम मशिन फोडुन जबरी चोरी किंवा दरोडा करण्याचा बेत असल्याबाबत माहिती दिली, त्यांचकडे मिळुन आली स्विप्ट गाडी ही सुध्दा चोरीची असल्याची माहिती पोलीसांना मिळाली असुन याबाबत सदर चार इसमांविरुध्द रोहा पोलीस ठाणे येथे गुरक्र २२३/१५ भादवि कलम ३९९ सह भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ (१) २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरिक्षक श्री संजय धुमाळ, रोहा पोलीस ठाणे हे करीत आहेत.


ABS
MH.16.AT.8392



# सुरभी ज्वेलर्स दरोडयातील आरोपी अटक सोन्याचा ऐवज जप्त दिनांक १/१०/२०१५

दिनांक २६/८/२०१५ रोजी पोयनाड पोलीस ठाणे हददीत सुरभि ज्वेलर्सवर पडलेल्या दरोडयाच्या तपासात ४ आरोपी निष्पन्न झाले असुन सदर आरोपीतांनी त्यांचा गुन्हयाच्या कटात सहभाग असल्याबाबत पोलीसांकडे कबुली दिलेली आहे. या चार आरोपींपैकी आरोपी क्रमांक १ वय २४ राहणार कुर्ला मुंबई आरोपी क्रमांक २ वय २३ वर्षे राहणार पोयनाड अलिबाग आरोपी क्रमांक ३ वय २३ वर्षे राहणार पोयनाड अलिबाग व आरोपी क्रमांक ४ वय २९ वर्षे राहणार पोयनाड अलिबाग यांना आज दिनांक १/१०/२०१५ रोजी अटक केली आहे.

अटक आरोपीतांकडुन ३,०३,३२४/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने पोलीसांनी हस्तगत करुन अदयापपावेतो एकुण १९,२१,९९९/- इतका माल हस्तगत केलेला आहे.



रोहा पोलीस ठाणे गु.र.नं.२०९/२०१५ भादंविसं कलम ३०२,३४ हा गुन्हा दिनांक ०१.११.२०१५ रोजी दाखल असुन सदर गुन्हयाचे तपासामध्ये ॲड.श्री.शिंदे यांनी विशेष कामगिरी करुन सदरील गुन्हा उघडकीस आणणेकामी मदत केली त्यांचा सत्कार करताना रायगड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री.सुवेज हक व सोबत सहा.पोलीस अधीक्षक श्री.महेश्वर रेडड्री.



ॲड.श्री.शिंदे